दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ३१९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१३ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# माणगावमध्ये २४ वर्षीय युवकावर अज्ञात इसमांचा गोळीबार

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव मध्ये २४ वर्षीय युवकावर अज्ञात इसमानी पिस्तूलमधून गोळी घालून जीवे ठार मारण्याचा प्रकार दि. ११ फेब्रुवारी रोजी रात्री १२.१० वाजण्याच्या सुमारास घडला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की,माणगाव मधील औषधांचे व्यापारी सोनी मेडिकल चे मालक ग्यानचंद जैस्वाल यांचा २४-वर्षीय मुलगा शुभम ग्यानचंद जैस्वाल हा आपले मुंबई गोवा हायवेवर असलेले दुकान बंद करून कचेरी रोड वरून पायी पायी घरी जात असताना कचेरी रोड कॉर्नर जवळ शारदा स्वीट दुकानासमोर आला असता, समोरून काळ्या रंगाची पल्सर गाडी घेऊन दोन अज्ञात इसम आले व त्यांनी शुमम जैस्वाल यांच्या जवळ येऊन गाडी थांबवली व इंदापूर कडे जायचा रस्ता कुठे आहे असे विचारले. शुभम हा रस्ता दाखवत असतानाच पल्सर वर डबल शीट मागे बसलेल्या इसमाने. स्वतः जवळील पिस्तुल काढली व शुभम याच्या पोटा जवळ नळी लावून फायर केली. व ते २ अज्ञात इसम मुंबई गोवा हायवेवरून इंदापूर बाजूकडे पलायन केले. यामध्ये शुभम जैस्वाल याला गंभीर दुखापत झाली असून,




त्याला पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे.

या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात कॉ. गु.र जि नं. २८/२०२२. भा .दं. वि. स कलम ३०७, ३४ व शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. व पुढील तपास माणगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सब इन्स्पेक्टर समद बेग हे करीत आहेत. हा गुन्हा घडल्याच्या ठिकाणी रायगड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक मा.अशोक दुधे साहेब यांनी भेट दिली व पुढील तपासाच्या सूचना देखील दिल्या आहेत व माणगाव शहरातील ही पहिलीच घटना असल्याने पोलिस यंत्रणा देखील कामाला लागली आहे.

# सुशासनासाठी वृत्तीतही बदल हवा : मुख्यमंत्री

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या जालना येथील नूतन वास्तूचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण




**दै.रायगड नगरी । मुंबई**

आपल्या कामामुळे सर्वसामान्य माणसाचे समाधान झाले पाहिजे. त्यादृष्टीने काम करणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. सुशासनासाठी वृत्तीतही बदल हवा, असे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. जालना येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये येणाऱ्या प्रत्येकाला न्याय मिळेल असा विश्वास देणे गरजेचे आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या येथील नूतन वास्तूचे लोकार्पण आज दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री राजेश टोपे (दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी), मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रकांत भडंग, विधी व न्याय राज्यमंत्री आदिती तटकरे (दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी), धर्मादाय आयुक्त प्रमोद तरारे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह (दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी), जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, अपर पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख, धर्मादाय वकील संघटनेचे अध्यक्ष ड. प्रदीप कुलकर्णी यांच्यासह विधी व न्याय विभागाचे अधिकारी, धर्मादाय वकील संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

श्री.ठाकरे म्हणाले की, प्रशासन आणि जनतेच्या सहकार्यामुळेच कोविड काळात राज्याचं काम देशात उजवं ठरलं. जास्तीत जास्त चांगली सेवा सर्वसामान्य माणसाला देता आल्यानेच जनतेचे प्राण आपण वाचवू शकलो. सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी चांगले काम केले. त्यामुळे या कामावर होणाऱ्या आरोपांना घाबरू नये.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, मिळालेल्या अधिकाराचा, पदाचा .../२

# नांदगाव पाली मार्गावर म्हशीला दुचाकीची ठोकर ; दोन तरुणांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली नांदगाव मार्गावर म्हशीला ठोकर लागून झालेल्या मोटारसायकल अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू तर दुसऱ्या तरुणाचा उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाल्याची घटना घडली. नांदगाव पाली रोडवर शर्मा फार्म हाऊस चे समोर हा अपघात घडला आहे.

याबाबत सविस्तर हकीकत अशी की रमेश शांताराम पवार वय २४ हा आपल्या ताब्यातील डिस्कव्हर कंपनीची मोटारसायकल क्र एम एच ०६ बी एच ६४५५ स्वतः चालवीत मागील सीटवर संतोष पवार याला घेऊन जात होता, पाली रोडवर नांदगाव गावचे हद्दीत शर्मा फार्म हाऊस समोर आले वेळी अचानक रस्त्यात म्हशी आडव्या आल्याने ठोकर होऊन अपघात झाला. या घटनेत रमेश शांताराम पवार याला गंभीर दुखापत झाली होती.

नाका तोंडातून व डोक्यातून रक्तस्त्राव होत असल्याने रमेश मयत झाला. तर गंभीर जखमी असलेल्या .../२

# प्लॉटिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर कर्जत मुख्याधिकाऱ्यांची कारवाई

**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत :** प्लॉटिक पिशव्यांवर शासनाने बंदी घातली आहे, तरी अजून काही व्यापारी, नागरिक राजरोस पणे प्लॉटिक पिशव्यांचा वापर करत आहे, प्लॉटिक पिशव्यांचा वापर करणाऱ्यांवर कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी दंडात्मक कारवाई केली आहे.

कर्जत शहरात प्लास्टिक बंदी काटेकोरपणे पाळली जात असून त्याची अंमलबजावणी करीत असताना नियम मोडणारे यांच्या विरुद्ध कडक कारवाई केली जात आहे, बाजार भरला होता मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सर्व कर्मचारी वर्गाला बरोबर घेवून सायंकाळी मुख्य बाजार पेठेत पाहणी केली, जे व्यापारी अजून ग्राहकांना प्लॉटिक पिशवी देतात अश्या तीन व्यापाऱ्यांवर प्रत्येकी ५ हजार रुपयांप्रमाणे दंडात्मक कारवाई केली. मुख्याधिकारी डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शखाली अरविंद नातू, जितेंद्र गोसावी, मनिष गायकवाड, लक्ष्मण माने, सुदाम म्हसे, सुनिल लाड आदी कर्मचारी वर्ग सहभागी होता.

> पथक फिरते राहणार आहे, जे कोणी प्लॉटिक पिशवीचा वापर करतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.
>
> **डॉ. पंकज पाटील (मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद)**



# जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने स्व.लतादिदींना संगीतमय श्रद्धांजली

## ‘तुम मुझे यू भुला ना पाओगे’ सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने भारतरत्न स्व.लता मंगेशकर यांना संगीतमय श्रद्धांजली वाहण्यात आली. शुक्रवारी (दि.११ फेब्रुवारी) संध्याकाळी पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात संगीतप्रेमींसाठी ’तुम मुझे यू भुला ना पाओगे’ या सांगीतिक कार्यक्रमाचे विनामूल्य आयोजन करण्यात आले होते.



लता मंगेशकर यांनी आपल्या कारकिर्दीत गायलेल्या निवडक गाण्यांचे यावेळी सादरीकरण करण्यात आले. जेष्ठ संगीत संयोजक अजय मदन, गायिका संगीता मेळेकर, मिथिला माळी, प्राजक्ता सातर्डेकर, निवेदक आर.जे.गौरव यांच्यासह संपूर्ण वाद्यवृंदाने सादर केलेल्या लता दिदींच्या गीतांनी पनवेलकरांचे मन लता दिदींच्या आठवणीत न्हाऊन निघाले. याप्रसंगी लतादीदींच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून उपस्थितांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

संगीत विश्वातील मातब्बर मंडळी ज्या सुरांना ’ईश्वाराचं देणं’ मानत वंदन करतात अशा भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे ६ फेब्रुवारी २०२१ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. मुंबईतील ब्रिच कँडी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. देशासह जगभरातील श्रोत्यांच्या जगण्याला अमृतसंजीवनी देत आलेला स्वर्गीय सूर हरपल्याने संपूर्ण देश शोकाकूल झाला आहे. लता दिदींना जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्यावतीने आदरांजली वाहण्यासाठी लतादीदींनी गायलेल्या गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार बाळाराम पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, उद्योजक दिलीप पाटील, शेकाप नेते नारायण घरत, काशिनाथ पाटील, आर सी घरत, साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रवींद्र पाटील, सुदाम पाटील, रामदास शेवाळे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व पनवेलकर संगीतप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लतादीदींच्या जाण्याने संगीत विश्वात फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. लता दीदींनी गायलेल्या गाण्यांच्या सादरीकरणातुन त्यांना सांगीतिक आदरांजली वाहण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल व उरण तालुक्यातील नागरिकांना लतादीदींच्या गाण्यांचे प्रेम देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आल्याची प्रतिक्रिया यावेळी पनवेल महापालिकेचे विरोधीपक्षनेते तथा जे एम म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केली.

## संक्षिप्त...

### २८ बँकांना २२ हजार कोटींचा गंडा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बँकिंग क्षेत्रात खळबळ उडवून देणारा सर्वात मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. एबीजी शिपयार्ड या कंपनीने देशातील आघाडीच्या २८ बँकांची तब्बल २२ हजार ८४२ कोटींची फसवणूक केली असून सीबीआयने सबळ पुरावे हाती येताच याप्रकरणी कारवाईचे पाऊल उचलले आहे. एप्रिल २०१२ ते जुलै २०१७ दरम्यान हा घोटाळा झाला असून कंपनीच्या तत्कालीन तीन संचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एबीजी शिपयार्ड ही एबीजी समूहातील प्रमुख कंपनी असून जहाज बांधणी आणि जहाजांची दुरुस्ती यात ही आघाडीची कंपनी मानली जाते. गुजरातमधील सुरत आणि दहेज येथे या कंपनीचे प्लांट असून कंपनीच्या संचालकांनी तब्बल २८ बँकांची फसवणूक केल्याचे उघड झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. एबीजी शिपयार्डचे तत्कालीन संचालक ऋषी अग्रवाल, संथनम मुथुस्वामी आणि अश्विनी अग्रवाल या तिघांसह कंपनीविरुद्ध सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बँकिंग क्षेत्रातील आजवरचा हा सर्वात मोठा घोटाळा असल्याचे सांगितले जात आहे. एबीजी शिपयार्डने बँकांची तब्बल २२ हजार ८४२ कोटींची फसवणूक केली आहे.

# नागोठण्यातील हुजरा मोहल्ला भागातील तरूणाकडून महिलेचा विनयभंग : पतीलाही मारहाण

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील आंगरआळी भागातील महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी नागोठण्यातील हुजरा मोहल्ला भागातील तरुण जुबेर अश्रफ पानसरे (वय ३२) या तरुणावर नागोठणे पोलिस ठाण्यात भादंवि संहितेच्या विविध कलमांखाली व कोविड काळातील आपत्ती व्यवस्थापन अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नागरिक व महिला वर्गातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

उपलब्ध माहितीनुसार नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १ मार्च, २०२० रोजी रात्री १२ वा. ते दि. ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी रात्री १२ वा. च्या दरम्यान मौजे नागोठणे हुजरा मोहल्ला येथील आरोपी जुबेर अश्रफ पानसरे (वय ३२) रा. हुजरा मोहल्ला नागोठणे ता. रोहा जि.रायगड याने कोरोना महामारीच्या काळातील पहीला लॉकडाउन चालु असतांना माहे मार्च २०२० मध्ये (नक्की तारीख माहीत नाही) दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास महिला फिर्यादी रा.अंगारआळी नागोठणे, ता. रोहा यांचे घरी जावुन तु खुप सुंदर आहेस असे बोलुन व फिर्यादी यांच्या स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व .../२

# जल जीवन मिशन अंतर्गत म्हसळा तालुक्यातील ४ गावांना रुपये २ कोटी ३९ लक्ष १ हजाराची मंजुरी

## ११७६ कुटुंबियांचा हंडा डोक्यावरून उतरणार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

सन २०२४ पर्यंत राज्यातील ग्रामीण भागांत १ कोटी ४२ लाख ३६ हजार नळजोडण्या देण्याचे केंद्र व राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे. त्याचाच भाग म्हणून रायगडच्या पालकमंत्री ना.अदीतीताई तटकरे आणि खासदार सुनिलजी तटकरे यानी म्हसळा तालुक्या तील केलटे ग्रामपंचायती मधील चंदन वाडी (रु २१ लक्ष), मांदाटणे (रु ९७.२८ लक्ष), साळविंडा (रु ९७.६४ लक्ष), तोराडी (रु २३.१८लक्ष) असे ४ गावाना रु २ कोटी ३९ लक्ष १ हजाराची मंजुरी



व कार्यादेश प्राप्त केले आसल्याचे ग्रा. पा.पुरवठा विभागाचे प्र.उपअभियंता युवराज गांगुर्डे यानी सांगितले.

ग्रामपंचायत केलेटे मधील चंदनवाडी या वाडीसाठी, बोअरवेल, ३ H.P.पंप व नळजोडणी यासाठी रु २१ लक्ष रुपये मंजुर आहेत, मांदाटणे योजनेमध्ये मांदाटणे, पाष्टी, पानदरे, मोरवणे ही चार गावे मोडत असून मुख्यत्वे विहीर, पंपींग, आणि पाणी लिफ्ट साठवण व वितरण हे समाविष्ट आहे. त्यासाठी रु९७ लक्ष २८ हजार मंजुर आहेत.

साळविंडा ह्या .../२

# रिक्षा स्टॅन्ड उपलब्ध करून न दिल्यास मनसे करणार आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरात रिक्षा चालकांची संख्या भरमसाठ वाढली असून रिक्षा चालकांना रिक्षा लावायला जागाच (स्टॅन्ड )नसल्याने रिक्षा चालक त्रस्त झाले आहेत. शासनाने रिक्षा चालकांसाठी, रिक्षा लावण्यासाठी जागेची व्यवस्था न करता भरमसाठ परवानगी देत शासन सुटले आहे. याविषयी रिक्षा चालकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

उरण चारफाटा येथे अनेकदा ट्रॅफिक पहावयास मिळते.दर रविवारी तर फुल ट्रॅफिक जाम पाहावयास मिळते. वाहनाना येण्या जाण्यासाठी रस्ताच नसतो. चारफाटा येथे बेकायदेशीर, अनिधिकृत दुकाने, टपऱ्या हातगाड्या यांचे बस्तान आहे. शिवाय चारफाटा येथे दर रविवारी आठवडा बाजार भरत असतो. तोही बेकायदेशीर. या आठवड्या बाजरा मुळे ट्रॅफिक जाम होतो. मात्र या बाबीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. अनधिकृत बेकायदेशीर टपऱ्या, दुकाने, हातगाड्या हटविन्या ऐवजी शासनच त्यांना पाठबळ देत असल्याचे चित्र येथे दिसून येत आहे. चारफाटा येथे आपले पोट भरण्यासाठी ५,६ मराठी स्थानिक रिक्षाचालक आपली रिक्षा लावतात मात्र तेथून रिक्षा हलविण्यासाठी सांगितले जाते. आणि त्या जागी मात्र टपऱ्या, हातगाड्या लावले जातात. त्यामुळे स्थानिक मराठी असलेल्या बेरोजगार तरुणांवर अन्याय होत आहे. रिक्षा चालकांकडून वारंवार मागणी करून सुद्धा त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे .../२

# वर्दीपूर्वीचे बाळकडू

वाहनपरवाना चाचणीत आमच्या प्रशिक्षकानेच वाहन चालवून दाखवले आणि आमची चाचणी पार पडली, असा किस्सा काही महाभाग पूर्वी सांगायचे. अशा मागच्या दरवाजाने कौशल्य सिद्ध केल्यावर, देशभरात कुठेही वाहन चालवण्याचा परवाना विनासायास हाती पडायचा. पोलिस भरतीत नुकताच उघड झालेला प्रकार याहून वेगळा नाही. पोलिस भरतीपूर्वीच्या शारीरिक तंदुरुस्तीच्या चाचणीत, उमेदवारांना प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांनीच चाचणी दिल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. या शिक्षकांना विद्यार्थ्यांचा इतका उमाळा आला, त्याचे कारण अर्थातच त्यांना प्रत्येक विद्यार्थ्यापोटी होणारी काही लाख रुपयांची प्राप्ती. राज्यातील पोलिस शिपायांची पदे भरण्यासाठी गेल्या नोव्हेंबरपासून लेखी व शारीरिक चाचणी सुरू झाली. पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद, नागपूर, मुंबई अशा सर्वच ठिकाणी या चाचण्यांमध्ये डमी उमेदवार बसवले गेल्याचे उघड झाले आहे. तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग केल्यास अपप्रवृत्तींची कटकारस्थाने कशी चव्हाट्यावर आणली जाऊ शकतात, त्याचे एक उदाहरणही यातून मिळाले. गैरप्रकारांचा वापर करून पोलिस दलांत भावी शिपाई भरती होण्यास पायबंद घालण्याचे काम पोलिसांनीच केले, हीदेखील सध्याच्या काळात प्रशंसनीय बाब म्हणावी लागेल. मुंबईत सुमारे हजार जागांकरिता लाखभराहून अधिक उमेदवारांनी परीक्षा दिली. एवढ्या सर्व उमेदवारांची प्रत्यक्ष छाननी करणे शक्य झाले नसते. अशा वेळी चाचणीदरम्यान केलेले चित्रीकरण उपयुक्त ठरले. मैदानी चाचणीचा टप्पा पार पडल्यानंतर चित्रीकरणातील चेहरे आणि अर्जातील छायाचित्रे यांची संगती लागत नसल्याने चक्रे फिरली; त्यातून हा प्रकार उघड झाला. त्यात उमेदवारांची सुस्पष्ट छबी टिपणाऱ्या अद्ययावत कॅमेऱ्यांचीही मदत झाली. पोलिस भरतीतील हे गौडबंगाल या वर्षी उघड झाले, याचा अर्थ यापूर्वीही याच गैरप्रकाराची घडी नक्कीच बसलेली असणार. गैरमार्गांचीही आपली अशी एक बिनधोक व्यवस्था तयार होते व त्यात अनेक गुन्हेगारांची मोठी साखळी तयार होत असते. सरकारी यंत्रणा व खासगी व्यक्ती यांचे साटेलोटे असते. योग्य ग्राहक शोधणारे, त्यांच्याकडे लाखोंची बोली लावणारे दलाल असतात. महाराष्ट्रातील हजारो तरुण सुरक्षित व चांगली सरकारी नोकरी म्हणून पोलिस भरतीकडे डोळे लावून बसतात. अशा तरुणांना गळाला लावण्यासाठी खासगी क्लासही मोठी भूमिका बजावतात. काही क्लासवाल्यांनी तर शंभर बेरोजगारांना शिपाई बनवण्याचे म्हणे 'मिशन'च हाती घेतले होते. या मिशनमागे एक पैशाचे मशीन कार्यरत होते. काही मध्यस्थांनी उमेदवारांकडून १३ ते १५ लाख रुपये घेतल्याचेही सांगितले जाते. अशा भ्रष्टाचारात खऱ्या रकमा कधीच बाहेर येत नाहीत. देणारा आपले सर्वस्व गमावून बसलेला असतो; मात्र असले व्यवहार कधी चिठ्ठ्याचपाट्यांवर होत नाहीत. मुंबई महानगर क्षेत्रात शेकडो तरुणांना विविध महापालिकांमध्ये नोकरी लावतो, असे सांगून हजारो-लाखो रुपये उकळल्याची प्रकरणे घडली आहेत. आजही घडत असतील. सध्या उघड झालेल्या प्रकरणात शारीरिक तंदुरुस्तीच्या चाचणीत उत्तेजक द्रव्यांचा वापर झाल्याचीही वदंता आहे. एकूणच, हा मामला गंभीर असून त्याची पाळेमुळे खणून काढण्याची गरज आहे. या घोटाळ्यांचा शोध केवळ पोलिस भरतीपुरता मर्यादित न राहता, सर्व सरकारी नोकऱ्यांच्या भरतीची सखोल चौकशी व्हायला हवी. आता प्रश्न उरतो तो अशा गैरमार्गाने होणाऱ्या भरतीतून तयार होणारे पोलिस दल. भरतीतील भ्रष्टाचाराचे प्रकार दर वर्षी होतात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगापासून ते इतर अनेक यंत्रणांच्या स्तरावर हा भ्रष्टाचार वेळोवेळी चव्हाट्यावर येतो. भरतीसाठी डमी उमेदवाराला तीन लाख देणाऱ्या नवनियुक्त पोलिस शिपायाचे पहिले उद्दिष्ट त्या तीन लाखांची वसुली, हेच राहणार. शिवाय हाच मार्ग हा शिपाई इतर होतकरूंना दाखवणार. मग स्वत:बरोबरच मंत्री किंवा वरिष्ठांसाठी लाखालाखाचा कडबा तो गोळा करणारच. मुंबई पोलिस दल सध्या ज्या कुटील कारस्थानांसाठी चर्चेत आहे, त्यासाठी हे सर्व अगदी यथायोग्य बाळकडू आहे. पोलिस दलात रुजू झाल्यानंतर ज्या गुन्ह्यांची उकल करण्याची जबाबदारी आहे, त्यातला एखादा तरी स्वतः केलेला असावा, हा उद्देश असावा. गुन्ह्यातल्या खाचाखोचाही त्यामुळे चांगल्या समजत असतील. मग भरतीखोरांकडून निस्पृह तपासाची व गुन्हेगारांना तुरुंगात पोहोचवण्याची अपेक्षा कशी करायची? 'जनसेवेस्तव असे कचेरी, ती डाकूंची नसे गुहा, मेजाखालून मेजावरतून द्रव्य कुणाचे लुटू नका,' हा कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांनी 'स्वातंत्र्यदेवीची विनवणी' करताना दिलेला मंत्र केवळ कागदावर उरतो आहे. मेजापल्याड द्रव्य देणे हाच प्रघात बनला आहे. पोलिस दलातील इतके अधिकारी, पोलिस आजवर गजाआड गेले. खंडणीचे अनेक गुन्हे दाखल झाले, तरी या व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा करावी, असे कोणत्याही राज्यकर्त्यांना वाटत नाही, ही यातील आणखी एक शोकांतिका आहे.

# अनधिकृत होर्डिंग्ज 'मेट्रो रेल्वे'ला धोका; नागरिकांमध्ये नाराजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शीघ्र कृती दल समोरील सिग्नल आणि भुयारी मार्गाच्या प्रवेशद्वार समोर काही दादा मंडळीकडून लावण्यात आलेले अनधिकृत होर्डिंग्ज मेट्रो रेल्वे मार्गावर असल्यामुळे 'मेट्रो रेल्वे'ला अडचणीचे ठरत असून, पनवेल महापालिका प्रशास-नाने सदर होर्डिंग्ज तात्काळ हटवावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



तळोजा वसाहतीत मोठ्या प्रमाणात खाजगी बिल्डरांचे इमारत बांधकाम प्रकल्प सुरु आहेत. घराच्या जाहिरातीसाठी काही दादा मंडळी शीघ्र कृती दल, तळोजा वसाहत भुयारी मार्ग आणि फेज दोन पेंधर मेट्रो स्थानक लगत नदी समोरील रस्त्यावर काही दादा मंडळींकडून लोखंडी होर्डिंग्ज उभारले असून, त्यावर परिसरात सुरु असलेल्या काही बिल्डरांच्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या जाहिराती झळकत आहेत. काही दादा मंडळीने सदर अनधिकृत होर्डिंग्ज उभारुन परस्पर होर्डिंग्जवर लावण्यात येणाऱ्या बांधकाम व्यवसायिकांकडून मोठ्या रक्कम गोळा करीत असल्याचे सांगितले जाते.

विशेषतः मेट्रो रेल्वे मार्गालगत लावण्यात आलेल्या होर्डिंग्जमुळे मेट्रो रेल्वे चालकाचे लक्ष विचलित होवू शकते. सदर अनधिकृत होर्डिंग्जवर पनवेल महापालिका आणि सिडकोकाडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्यामुळे नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत. दरम्यान, मेट्रो रेल्वे मार्गात जाहिरात लावणे योग्य नसून, या विषयी पोलीस प्रशासनाकडे पोलीस बंदोबस्तची मागणी करुन लवकरच सदर अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई केली जाणार आहे, असे पनवेल महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

# तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा प्रस्तावित योजनेच्या प्रारूप आराखडा तयार करण्याचे कामाला मिळाली गती

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील तोंडसुरे पंचक्रोशीतील ८गावे आणि ४ वाड्याना पाणी पुरवठा करणेसाठी महाराष्ट्र शासनाने तोंडसुरे प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पाभरे येथील धरण प्रकल्पातुन सन १९९७-९८ मध्ये कार्यान्वित केली आहे. सदरच्या योजनेला आता ३० वर्षे झाली असल्याने हि योजना आता जीर्ण झाली आहे.

पाणी टंचाईच्या वेळी येथील जन-तेला पाण्यासाठी वणवण करावी ला-गते. तोंडसुरे पंचक्रोशीतील पाणी टंचाईचे दुर्मिक्ष कायमस्वरूपी संपण्यासाठी नव्याने खरसई धरण प्रकल्पामधून नवीन योजना मंजुर करण्यासाठी रायगडचे खासदार सुनिलजी तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांची पाणी पुरवठा कमिटी अध्यक्ष महादेव पाटील व कमिटी सदस्यांनी ४ फेब्रुवारी माघी गणेशोत्सवाचे दिवशी भेट घेऊन निवेदन दिले होते. अवघ्या सहा दिवसात खासदार सुनिल तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांचे आदेशाने व शिफारसीने रायगड जिल्हा परिषदेचे मार्फत जलजीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत खरसई धरण प्रकल्पामधुन सुधारित योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे कामाला सुरुवात झाली असल्याचे कमिटीचे अध्यक्ष तथा माजी सभापती महादेव पाटील यांनी माहिती व धन्यवाद देताना सांगितले.

योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे काम एनजेएस इंजेनिअर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने घेतले आसुन दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजी योजनेचे प्रकल्प सल्लागार डी.के.महाजन यांनी पाणी पुरवठा कमिटीचे सोबत योजनेची प्रत्यक्ष पहाणी करून योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्याचे कामाला सुरुवात केली आहे. योजनेचाप्रारूप आराखडा तयार करण्याचे पाहणी दौऱ्यात प्रकल्प अधिकारी महाजन यांचे समावेत पाणी पुरवठा कमिटीचे अध्यक्ष तथा माजी सभापती महादेव पाटील, सरपंच वनिता खोत, सरपंच इरशाद फकिह, सरपंच स्मिता जंगम, समिती उपाध्यक्ष मनोज नाक्ती, सचिव स.भी.पवार, कमिटी सदस्य रियाजभाई फकिह, सरपंच अनंत कांबळे, माजी सरपंच भिकु पाटील, प्रकाश गाणेकर, शेखर खोत, अनिल टिंगरे, भालचंद्र गाणेकर आदी उपस्थित होते.

# मनसे शाखा नविन शेवा तर्फे स्मशानभूमी समोर सुशोभिकरण

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना शाखा नविन शेवा यांच्या संकल्पनेतून नविन शेवा स्मशानभूमी समोर सुशोभिकरण करण्यात आले. यामध्ये नागरीकांना बसण्यासाठी बँचेस बसविण्यात आले आहेत व पाण्याची टाकी लाऊन पाण्याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.



सुशोभिकरणाचे उदघाटन ग्रामपंचायत महिला सदस्य व सर्वपक्षीय महिला पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. उदघाटन प्रसंगी गावचे ग्रामसुधारणा मंडळ अध्यक्ष कमळाकर पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष हेमंत म्हात्रे, पोलिस पाटील मनोहर सुतार व ग्रामस्थ उपस्थित होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेना नवीन शेवाच्या माध्यमातून नेहमी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. या सामाजिक उपक्रमाला जनतेचाही नेहमी उत्तम प्रतिसाद लाभत असतो. स्मशान भूमी समोर सुशोभीकरण करून तसेच पाण्याची व्यवस्था करून मनसेने आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. मनसेने केलेल्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सुशासनासाठी वृत्तीतही बदल हवा : मुख्यमंत्री

समाजासाठी वापर करणे गरजेचे आहे. केवळ इमारतीचे नुतनीकरण करून चालणार नाही. काम करण्याच्या वृत्तीतही बदल करणे आवश्यक आहे. सुशासनासाठी कार्याच्या पद्धतीत बदल करणे, लोकाभिमूख कार्याची दिशा निश्चित होणे आवश्यक आहे. विधी व न्याय विभागात रिक्त असलेल्या जागा भरण्याबरोबरच आवश्यक असलेल्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

पालकमंत्री राजेश टोपे म्हणाले की, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रयत्नातून जालन्याच्या वैभवात भर टाकणारी अत्यंत सुंदर, सुबक अशी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाची नवीन इमारती उभारण्यात आली आहे. धर्मादास रुग्णालयाच्या बऱ्याच तक्रारी असतात. सामान्य माणसांना आरोग्य सुविधा देण्यासाठी या रुगणालयांवर सनियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. कोरोना काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात राज्यात उत्तमरित्या काम करण्यात आले. धर्मादाय संघटनांनीसुद्धा खूप चांगली मदत करत ३ कोटी रुपयांपर्यंतचा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी उपलब्ध करुन दिला.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती चंद्रकांत भडंग म्हणाले की, दिवाणी आणि फौजदारी न्यायालयापेक्षा या कार्यालयाचे काम पूर्णत: वेगळे आहे. न्यास नोंदणी कार्यालयाचे काम धार्मिक संस्था किंवा बिगर सरकारी संस्थांशी निगडित असल्याने या कार्यालयाचे काम समाजहिताशी संबंधित आहे. जालना येथे उभारण्यात आलेल्या इमारतीच्या सभोवताली मोठी जागा उपलब्ध आहे तिथे न्यायिक कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची उभारणी, इमारतीला पोहोच रस्ता व्हावा. मुंबईच्या नवीन मुख्य कार्यालयाची पायाभरणी लवकर व्हावी. विधी व न्याय विभागाच्या राज्यमंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील विविध धर्मादाय संस्था, नोंदणीकृत धार्मिक संस्थांना या इमारतीमुळे चांगली सेवा उपलब्ध होईल, या संस्थांच्या विविध समस्यांच्या निराकरणाला गती मिळेल. जिल्ह्यातील न्यायालये, न्यास कार्यालये उत्तम दर्जाच्या सुविधांनी युक्त असावेत हा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा नेहमी आग्रह असल्याचे सांगत जालन्यातील सर्व नागरिकांसाठी ही इमारत उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी आभारही व्यक्त केले. धर्मादाय आयुक्त प्रमोद तरारे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांच्या विशेष प्रयत्नातून कोरोना काळातही ही सुंदर इमारत पूर्ण झाली. जालना येथे स्वतंत्र इमारतीची आवश्यकता होती ती आज यानिमित्ताने पूर्ण झाली. प्रास्ताविक सहधर्मादाय आयुक्त सुरेंद्र बियाणी यांनी तर आभार धर्मादाय वकील संघटनेचे अध्यक्ष पी. डब्लू. कुलकर्णी यांनी मानले.

## नांदगाव पाली मार्गावर म्हशीला दुचाकीची ठोकर ; दोन तरुणांचा मृत्यू

संतोष रामचंद्र पवार यास उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथून मुंबईला नेत असताना त्याचा देखील रस्त्यात मृत्यू झाला. या घटनेची पाली पोलीस स्थानकात मोटार अपघात ०४/२०२२ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पाली पोलिस निरीक्षक विश्वजित काईनगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो ना एस एन फडताडे करीत आहेत.

## नागोठण्यातील हुजरा मोहल्ला भागातील तरूणाकडून महिलेचा विनयभंग : पतीलाही मारहाण

त्यांनतरही आरोपी याने फिर्यादी यांचा वारंवार पाठलाग करून त्याचे फोटो व व्हीडीयो सर्वाना दाखवुन बदनामी करण्याची तसेच फिर्यादी यांचे पतींना मारण्याची धमकी दिली. हे असे प्रकार काही दिवसांपासून सुरु असतांनाच शुक्रवार दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी महिला फिर्यादी तसेच त्यांचे पती आरोपी याचे घरी गेले आणि तुझ्याकडे कोणते फोटो व व्हिडीओ आहेत ते दाखव असे आरोपी जुबेर याला विचारत असतानाच इतर चार आरोपींनी संगनमत करून गैरकायद्याची मंडळी जमा करून जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांनी पारीत केलेल्या जमावबंदी आदेशाचे व कोविड-१९ बाबत शासनाने दिलेल्या नियमांचे उल्लंघन करून फिर्यादी तसेच त्यांचे पती यांना हाताबुक्याने मारहान करून शिवीगाळी व दमदाटी केली. याबाबत नागोठणे पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२/२०२२ भा.दं.वि.क.३५४/३५४ अ/३५४ड/ ३२३/ ५०४/ ५०६/ १४३/ १४७/ १४९/ २६९/ २७० आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस नाईक एम.ए. पाटील या करीत आहेत.

## जल जीवन मिशन अंतर्गत म्हसळा तालुक्यातील ४ गावांना रुपये २ कोटी ३९ लक्ष १ हजाराची मंजुरी

योजनेत तीनही वाड्याना गुरुत्ववाहीनीने पाणी पुरवठा, बंधारा, कलेक्टींग चेंबर, साठवण टाकी हे समाविष्ट असून रू ९७ लक्ष ६४ हजार मंजुर आहेत. तोराडी योजनेमध्ये विहीर, पंप साठवण टाकी या गोष्टी समाविष्ट असून रुपये २३ लक्ष १८ हजार मंजूर आहेत. जलजीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घरापर्यंत नळ जोडणीच्या माध्यमातून पाणी पोहचविण्याचा केंद्र व राज्य शासनाचा मुख्य हेतू आहे.जल जीवन मिशन योजनेसाठी ४५% केंद्र शासन, ४५% राज्यशासन व १० % स्थानिक लोकवर्गणी असे आर्थिक नियोजन असते. जल जीवन मिशन अंतर्गत तालुक्यातील प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनेचे नाव १) सोनधर २) कुडगाव. अंदाज पत्रक सादर झालेल्या योजना १) खारगांव (बु) २) ठाकरोली, ३) भेकऱ्याचा कोंड, ४) चिचोडा तालुक्यातील अन्य १३ गावांतील योजनांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे समजते. २०२४ पर्यंत नळजोडण्यांचे हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची सर्व यंत्रणांनी युद्ध पातळीवर अंमलबजावणी करावी जल जीवन मिशन अंतर्गत उद्दिष्ट मोठे असले तरी काम पूर्ण करायचे आहे, असे निर्देश पालकमंत्री ना.आदीती ताई, खासदार सुनिल तटकरे, आणि C.E.O. डॉ. किरण पाटील यांचे आहेत, त्या दृष्टीने सातत्याने पाठपुरावा असतो.

## रिक्षा स्टॅन्ड उपलब्ध करून न दिल्यास मनसे करणार आंदोलन

चारफाटा येथे चालू असलेले अनिधिकृत बेकायदेशीर टपरी, दुकाने, हातगाड्या यांचे आर्थिक हितसंबंध असल्यामुळेच त्यांना परवानगी दिली जाते मात्र यामुळे रिक्षा चालकांवर अन्याय केला जात आहे. यामुळे सर्व रिक्षा चालक त्रस्त झाले आहेत.

सरकारने भरमसाठ रिक्षा परमिट सोडून रिक्षा चालकांवर अन्यायच केले आहे. नगर पालिका किंवा ग्रामपंचायत यांच्याकडे विचारपूस केली की रिक्षा लावण्यासाठी परवानगी दिले जात नाहीत. उरण शहरात किंवा ग्रामपंचायत हद्दीत रिक्षा लावण्यासाठी पुरेशी जागा आहे कि नाही याचा विचार न करता शासन भरमसाठ रिक्षा परमिट सोडत आहे.आणि रिक्षा चालकांना संकटात टाकत आहे. एक प्रकारे भरमसाठ परमिट काढून बेरोजगार युवकांना आणखीन बेरोजगार करण्याचा हा शासनाचा प्रयत्न आहे.शासनाकडे रिक्षा स्टँडची मागणी करून सुद्धा रिक्षा स्टॅन्ड देण्यास शासन असमर्थ ठरत आहे.चार फाटा उरण येथे मोरा या ठिकाणी जाण्यासाठी साठी ५/६ गाड्या कोणालाही त्रास न देता लावत आहेत तरी त्या गाड्या हटवून तेथे हात गाड्या लावण्यात येतात तर रिक्षा लावल्या तर त्रास होतो आणि हातगाड्या लागल्या तर त्रास होत नाही का ? हा रिक्षा चालकांवर अन्याय होत आहे तरी मोरा रिक्षा चालकांना न्याय पाहिजे अन्यथा मनसे रिक्षा युनियन मनसे पद्धतीने आंदोलन पुकारेल असा इशारा मनसे रिक्षा युनियन उरण मोरा रोडचे अध्यक्ष दिनेश हळदनकर, मनसे नेते संदेश ठाकूर यांच्यासह मनसेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# क्रिकेट खेळताना हृदयविकाराने मृत्यू होण्याच्या घटनेत वाढ



**दै.रायगड नगरी । ठाणे-रायगड**

कोरोनाचा प्रसार कमी झाल्यावर नवी मुंबई व रायगड यामध्ये क्रिकेट स्पर्धांना जोर आलं असून शहरातील लहान मोठी मंडळे डे -नाईट क्रिकेट स्पर्धा भरवीत आहेत. आरोग्य क्षेत्रातील एक आकडेवारीनुसार २०२०- २१ मध्ये महाराष्ट्रामध्ये ३० ते ४० तरुणांचा क्रिकेट मैदानावर मृत्यू झाला आहे, त्यामुळे तरुणांनी क्रिकेट खेळताना सावधानता बाळगणे जरुरी आहे. क्रिकेट अथवा इतर कोणतेही स्पर्धात्मक खेळ खेळतांना वैद्यकीय प्रशिक्षक अथवा निरीक्षक असणे जरुरी असल्याचे मत वैद्यकीय क्षेत्रातून व्यक्त होत आहे. याविषयी अधिक माहिती देताना कामोठे येथील क्रिटीकेयर लाइफलाईन हॉस्पिटलचे हृदयविकार तज्ज्ञ डॉ. अविनाश गुठे म्हणाले, आपण सर्वजणच कोरोनाच्या महामारीतून सावरत आहोत, गेली दोन वर्षे आपण घरामध्ये अडकून राहिलो होतो तर अनेकांना कोरोनाची लागण झाली होती यामध्ये तरुणांचा सुद्धा समावेश होता. त्यामुळे कोरोना झालेल्या नागरिकांनी किमान वर्षभर तरी काळजी घेतली पाहिजे.

आजमितीला मुंबईसह नवी मुंबई, रायगड ठाणे पालघर या लगतच्या शहरांमध्ये क्रिकेटस्पर्धांमध्ये १८ वर्षांपासून ते पन्नाशी पार केलेल्या नागरिकांचा यात थेट सहभाग असतो . खेळत असताना शरीरातील पाणी कमी झाल्यामुळे चक्कर येणे , पडल्यामुळे दुखापत होणे तसेच उच्च रक्तदाब वाढल्यामुळे भोवळ येणे असे प्रकार मैदानात होत असतात, अशावेळी तात्काळ उपचार करणे फार गरजेचे असते. अनेकवेळा चक्कर आल्यावर त्या खेळाडूला सावलीत बसविले जाते अथवा तंबूमध्ये आराम करण्यास सांगितले जाते परंतु असे करणे चुकीचे आहे. तिशीच्या तरुणांमध्ये हृद्यविकार वाढत असून त्यामागची कारणे ही आजच्या विसंगत जीवनशैलीमध्ये सापडतात. मुखत्वे खाण्याच्या व झोपण्याच्या वेळेत झालेला कमालीचा बदल शारीरिक व मानसिक ताणतणाव वाढण्यास कारणीभूत ठरतो. बदललेल्या जीवनशैलीमुळे मधुमेह व उच्च रक्तदाब चोर पावलांनी शरीरात शिरल्यावर हृदयविकार होण्याचा धोका अधिक वाढतो. जेंव्हा मैदानात खेळ सुरु असताना तेथील स्पर्धेच्या वातावरणामुळे शरीरातील रक्तदाब हा वाढलेला असतो अशा वेळी ज्या व्यक्तीला उच्च रक्तदाबाचा त्रास असतो त्या खेळाडूचे हृदयाचे ठोके अव्यवस्थित होतात, कमी वा जास्त होतात अशावेळी डॉक्टरांचे मार्गदर्शन घेणे फार गरजेचे असते.

दिवसभर काम करून थकलेल्या शरीराला विश्रांतीची नितांत गरज असते हीच विश्रांती झोपेच्या माध्यमातून मिळत असते. म्हणजेच शरीर आरोग्यदायी ठेवण्यात झोपेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत असते; पण काही लोक रोज प्रमाणापेक्षा जास्त, तर काही जण कमी झोप घेत असतात याचा परिणाम मात्र त्यांच्या आरोग्यावर होत असतो.रोज सात तासांपेक्षा कमी अथवा जास्त झोपेचा थेट संबंध हृदयाच्या तारुण्याशी येतो. जी तरुण मंडळी रोज सात तासांपेक्षा कमी झोप घेते त्यांचे हृदय वृद्धत्वाकडे जात असल्याचे अमेरिकेतील जॉर्जियामधील 'इमोरी युनिव्हर्सिटी'तील संशोधनात दिसून आले आहे. सततचा मानसिक ताणतणाव, बिघडलेली आर्थिक गणिते, नात्यांमधील दुरावा व सोशल मीडियाच्या आहारी गेलेली तरुण पिढी पाहता भविष्यात हृद्यविकार वाढण्याची शक्यता असून रोजच्या जीवनशैलीमध्ये तत्काळ बदल करणे गरजेचे आहे असे मत क्रिटीकेयर लाइफलाईन हॉस्पिटलचे हृदयविकार तज्ज्ञ डॉ. अविनाश गुठे यांनी व्यक्त केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# ७ नोव्हेंबर राष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा करावा : राष्ट्रपती रामनाथ कोविंद

**रत्नागिरी : वृत्तसंस्था**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शिक्षणाबाबतची ओढ आणि निष्ठेचे आजच्या युगात स्मरण करण्यासाठी ०७ नोव्हेंबर हा राष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा करावा, अशी सूचना महामहीम राष्ट्रपती राम नाथ कोविंद यांनी आज येथे केली.

मंडणगड तालुक्यातील डॉ. आंबेडकर यांच्या मूळ गाव असलेल्या आंबडवे येथे राष्ट्रपती कोविंद यांनी सपत्नीक भेट देऊन आदरांजली अर्पण केली. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रपती महोदयांच्या सुविद्य पत्नी सविता कोविंद, राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, रत्नागिरीचे पालकमंत्री ॲड अनिल परब, राज्यमंत्री संजय बनसोडे, जिल्हा परिषद अध्यक्ष विक्रांत जाधव, खासदार सुनिल तटकरे, राष्ट्रीय भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष भिकू उर्फ दादा इदाते हे व्यासपीठावर उपस्थित होते.



राष्ट्रपती कोविंद पुढे म्हणाले की, ०६ डिसेंबर हा डॉ. आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन म्हणून साजरा केला जातो. २०१५ सालापासून २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून राष्ट्रीय पातळीवर साजरा केला जात आहे. १४ एप्रिल रोजी बाबासाहेबांची जयंती सर्वत्र साजरी होते. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने ०७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. कारण याच दिवशी १९०० साली बाबासाहेबांनी शाळेमध्ये प्रवेश घेऊन शिक्षणाचा श्रीगणेशा केला होता. मला असे वाटते की, हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून राष्ट्रीय पातळीवरील डॉ.आंबेडकरांच्या शिक्षण विषयक ओढ आणि निष्ठेचे स्मरण करुन देण्यासाठी तो साजरा करणे आवश्यक आहे. येथे बसलेल्या संसदेतील सदस्यांनी याबाबत पुढाकार घ्यावा, मी त्यांना माझ्या परीने मदत करीन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याशी संबधित पाच ठिकाणांना पंचतीर्थाचे नाव देऊन केंद्र सरकारने या सर्व ठिकाणी आदंराजली अर्पण करण्याची स्तुत्य पध्दत सुरु केली आहे. त्यांची जन्मभूमी, नागपूरची दीक्षा भूमी, दिल्लीचे परिनिर्वाण स्थळ, मुंबईची चैत्यभूमी आणि लंडन मधील आंबेडकर मेमोरियल होम या पाच ठिकाणी बाबासाहेबांचा आदर्श मानणारे लोक श्रध्दाजंली अर्पण करतात. माझी केंद्र सरकरला अशी सूचना आहे की, याच मालिकेत बाबासाहेबांचे मूळ गाव असलेल्या आंबडवे येथील स्मारकही तीर्थस्थळ म्हणून घोषित करण्यात यावे आणि या गावाचे स्फूर्तीभूमी असे नामाभिधान करण्यात यावे.

याप्रसंगी बोलताना राज्यपाल भगत सिंह कोश्यारी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर मोठा व्यासंग केला. आजच्या पिढीतही ही प्रवृत्ती निर्माण व्हावी म्हणून या ठिकाणी उत्तमोत्तम पुस्तके असलेले ग्रंथालय निर्माण करण्याची सूचना राष्ट्रपती कोविंद यांनी आताच स्मारकाला भेट दिली तेव्हा केली आहे. त्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सहकार्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे. या उपक्रमामध्ये मी ही सहभागी होऊ इच्छितो. त्या दृष्टीने राज्यपालांनी राज्यपाल विवेकानुदान निधीतून ३० लाख रुपये देण्याची घोषणा केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पालकमंत्री ॲड अनिल परब यांनी राष्ट्रपती राम नाथ कोविंद, त्यांच्या पत्नी सविता कोविंद आणि महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतात आंबडवे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचा आणि या परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्यशासन सर्वोतोपरी प्रयत्न करील, अशी ग्वाही दिली. प्रास्ताविकामध्ये राष्ट्रीय भटके विमुक्त जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष भिकू उर्फ दादा इदाते यांनी बाबासाहेबांचे बालपण, त्यांचे कर्तृत्व, त्यांचे विचार, आंबडवे गावाची पार्श्वभूमी, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ या शाळेच्या माध्यमातून केले जाणारे शैक्षणिक काम याविषयीचे विवेचन केले. कार्यक्रमाची सुरुवात व सांगता पोलीस बँड पथकाने राष्ट्रगीताची धून वाजवून केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाशवाणीचे सुप्रसिध्द निवेदक मनोज क्षीरसागर यांनी केले.

या कार्यक्रमास राष्ट्रपती भवन कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारी, राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे, विभागीय आयुक्त विलास पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय मोहिते, जिल्हाधिकारी डॉ. बी.एन.पाटील, पोलीस अधी–क्षक डॉ. मोहितकुमार गर्ग, परिविक्षाधीन पोलीस अधीक्षक श्री. रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, उपजिल्हाधिकारी अमिता तळेकर, प्रांतधिकारी प्रवीण पवार, प्रांतधिकारी शरद पवार, तहसिलदार, महसूल, पोलीस, जिल्हा परिषद तसेच प्रशासनातील इतर विभागाचे अधिकारी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुटुंबातील सदस्य, आंबडवे ग्रामस्थ कोविड नियमांचे पालन करीत उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून बेटी बचाओ, बेटी पढाओ ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

राज्यस्तरीय वत्तृफ्त्व स्पर्धेचे आयोजन भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून करण्यात आले असून प्रदेश संयोजक डॉ.शुभा पाध्ये यांच्या नेतृत्वाखाली सदर स्पर्धेची घोषणा झाली आहे. या स्पर्धेचा उद्देश युवा वर्गात 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानाविषयी जागृती निर्माण करणे हा आहे. या स्पर्धेतून अनेक उत्तम वक्तृत्व असणाऱ्या व समाजापुढील प्रश्नांवर विचारमंथन करण्यास इच्छुक असणाऱ्या युवक युवतींना आपले विचार निर्भीडपणे मांडण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध केलेले आहे.

जिल्हा संयोजक दक्षिण रायगड श्रीमती निलिमा राजेय भोसले यांनी या स्पर्धेत रायगडातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घ्यावा असे आवाहन केले आहे. प्रथम पारितोषिक रू.२१,हजार, द्वितीय पारितोषिक रू.११ हजार, तृतीय पारितोषिक रू.७ हजार तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही दिली जाणार आहेत.

स्पर्धेचे विषय १)आजची पिढी, तंत्रस्नेही पिढी. २) विचार मंथन–लग्नाचे वय २१. ३)सृजनकर्ती मी,तरी अजूनही असुरक्षित मी. ४)भारतीय स्त्री,आत्मनिर्भर स्त्री. ५)मुलगी देशाची शान,प्रत्येक घराचा सम्मान असे असून १६ ते २५ वर्षे वयोगटातील मुले–मुलींसाठी असलेली ही खुली स्पर्धा आहे. स्पर्धेसाठी भाषा माध्यम मराठी,हिंदी,इंग्रजी पैकी एक निवडायचे असून स्पर्धा कालावधी २४ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२२ पर्यंत आहे. यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग ३ ते ५ मिनिटांचे असावे तर व्हिडिओ साईज ५० ते ६० मेगाबाईटस्पेक्षा जास्त नसावी. स्पर्धकाचे नाव, जन्म तारीख,संपर्क क्रमांक, राहता पूर्ण पत्ता तसेच स्पर्धकाचे आधारकार्ड अशी माहिति जोडायची आहे.सदर व्हिडिओ आणि माहिती फक्त ईमेलद्वारे पाठवायचे असून अधिक माहितीसाठी श्रीमती निलिमा राजय भोसले–९१३००१६९६७ आणि अतुल प्रजा–पती–९८३३२९६६२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन सपना सचिन बुटाला यांनी केले आहे.

## अनोळखी इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**


महावीर सोसायटी ,सेक्टर ३, ऐरोली नवी मुंबई समोरील फुटपाथवर बेशुद्धावस्थेत ५० ते ५५ वर्षे इसम पोलिसांना सापडला. त्याला वाशी मनपा हॉस्पिटल येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले आहे. रबाळे पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

त्याची उंची अंदाजे साडेपाच फूट, रंग सावळा, अंगाने सडपातळ असून चेहरा उभट आहे. त्याच्या डोक्याचे केस पांढरे असून अंगात मेहंदी रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची पँट घातलेली आहे. या ईसमाबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी रबाळे पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक स्वप्निल माने यांच्याशी संपर्क साधावा.

# हेदवली येथे श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज नामस्मरण सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील हेदवली (ता.रोहा) येथे श्री ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज नामस्मरण सोहळ्याचे आयोजन रविवार दि. १३ फेब्रुवारी २०२२ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे हे १९ वे वर्षं असून यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात रविवारी सकाळी ६.३० वाजता काकड आर–तीने होणार आहे. त्यानंतर दिवसभराच्या कार्यक्रमांत पंचपदी भजन, सामुदायिक नामजप, सामुदायिक भजन होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ४ वाजता ह.भ.प. नारायण महाराज लाड (हेदवली) यांचे प्रवचन तर ६.३० वाजता ऐनघर पंचक्रोशी व हरी ओम मित्र मंडळ हेदवली यांचा हरीपाठ होणार आहे. त्यानंतर अन्नप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. रात्री ९.३० वाजता ह.भ.प. मारुती महाराज कोल्हटकर (तळवली) यांच्या सुश्राव्य किर्तनाने या नामस्मरण सोहळ्याची सांगता होणार आहे.

या नामस्मरण सोहळ्याला भाविकांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन श्री ब्रम्हचैतन्य सेवा मंडळ, ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व नवतरुण मंडळ हेदवली यांनी केले आहे.

# अमित ठाकरे यांच्या हस्ते मनसेच्या मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्राच्या, मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राजकीय पक्षाला युवकांचा, जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. दिवसेंदिवस रायगड जिल्हा व नवी मुंबई परिसरात मनसेला वाढता पाठींबा मिळत आहे. रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात व नवी मुंबईमध्ये पक्षाचा प्रचार व प्रसार जोरात सुरु आहे.

पक्ष बांधणी, पक्ष संघटनही जोरात सुरु आहे. पक्ष आणखीन मजबूत करण्याच्या व नागरिकांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीकोणातून पदाधिकारी कार्यकर्ते यांचे हीत लक्षात घेऊन दि ११/२/२०२२ रोजी तेजस बिल्डिंग, तळ मजला, ठाणा नाका रोड, प्रांत ऑफिस जवळ, पनवेल येथे राजमाता जिजाऊ गड या नावाने मनसेचे जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे उदघाटन मनसेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच प्लॉट नंबर ४१८, कृष्णाई रेसिडेन्सी, सेक्टर २४ उलवे, नवी मुंबई येथेही मनसेच्या कार्यालयाचे उदघाटन अमित ठाकरे यांच्या हस्ते झाले. महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी, महिलांना न्याय देण्यासाठी पनवेल येथे जिल्हा मध्यवर्ती कार्यालय सुरु करण्यात आल्याची माहिती मनसे महिला जिल्हाध्यक्ष आदिती सोनार यांनी दिली. यावेळी अमित ठाकरे यांनी पनवेलच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी तळागाळात जाऊन कार्य करण्याचा सल्ला महिलांना, पदाधिकारी कार्यकर्त्यांना दिला.रायगड जिल्ह्यात व नवी मुंबई परिसरात मनसेचे सुरु असलेले कार्य, नवीन शाखा, पक्ष प्रवेश सोहळे या बद्दल जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांनी माहिती दिली. यावेळी मनसे नेते राजू दादा पाटील, नवी मुंबई अध्यक्ष गजानन काळे, रायगड जिल्हाध्यक्ष अतुल भगत, संपर्क प्रमुख स्नेहल जाधव, रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, जिल्हाध्यक्ष महिला सेना –अदिती सोनार, जिल्हाध्यक्ष विद्यार्थी सेना अक्षय काशीद, जिल्हाध्यक्ष चित्रपट सेना अक्षय सुतार, जिल्हाध्यक्ष ठाणे पालघर –अविनाश पडवळ, पनवेल तालुका अध्यक्ष वर्षा पाचभाई, पनवेल शहर अध्यक्ष प्रीती खानविलकर, पनवेल शहर उपाध्यक्षा स्वरूपा सुर्वे, तालुका सचिव रुपाली मुरकुटे, उलवे शहर अध्यक्ष राहुल पाटील, कल्पेश कोळी उपाध्यक्ष उलवे शहर, मनोज कोळी सचिव उलवे शहर, प्रथमेश सोमण तसेच मनसेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. नवीन कार्यालयांचे उदघाटन झाल्याने पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे, उत्सा–हाचे वातावरण आहे.

# हजरत पीर करमअली शाह दर्गावर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रकृतीसाठी सय्यद अकबर यांनी केली चादर अर्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**



रायगड जिल्ह्यातील पनवेल महानगराच्या मध्यवर्ती स्थापित लाखों लोकांचे श्रद्धास्थान हजरत पीर करमअली शाह दर्गावर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उत्तम निरोगी प्रकृतीसाठी भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पिं–परी चिंचवड प्रभारी कोकण डायरीचे संपादक सय्यद अकबर यांनी चादर चढवून दुवा केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब गोरगरिबांचे प्रश्न ऐकून सर्वांनाच मदत करतात. सकाळ पासून त्यांच्याकडे लोकांची अक्षरशः रांग लागलेली असते. कोवीड सारख्या वातावरणात देखील त्यांच्या मदतीचा ओघ जनसामान्यांसाठी थांबला नाही.

आपल्या स्वतःच्या प्रकृती पेक्षा जनतेचे प्रश्न महत्वाचे असे त्यांचे ब्रीद कायम आहे. त्यामुळे त्यांना उत्तम आरोग्य मिळावे लोकनेते म्हणून त्यांचे कार्य अवीरत कायम राहावे यासाठी सय्यद अकबर यांनी हजरत पीर करमअली शाह दर्गावर प्रार्थना केली.

त्यांच्यासह भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनातील अण्णा हजारेंचे खंदे कार्यकर्ते अल्लाउद्दीन शेख, जेष्ठ पत्रकार किरण बाथम,इम्तियाज बेग,विलास बोडके उपस्थित होते.

तौफिक खांडे यांनी यावेळी लवकरच होणाऱ्या हजरत पीर करमअली शाह दर्गा संदल उत्सवाच्या निमित्ताने निशाण फडकवण्याचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी अनेक भाविक देखील हजर होते.


## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री.शैलेश शंकर यांचे दि.१०/०७/२०२१ रोजी मु.आखर, पोस्ट साकुर, नाकेंदी डोह, तालुका जवाहर, जिल्हा पालघर येथे निधन झालेले आहे. खालील परिशिष्टात वर्णन केलेली मालमत्ता ही मयत श्री.शैलेश शंकर व त्यांची पत्नी ममता शैलेश शंकर यांचे मालकीची असून श्रीमती.ममता शैलेश शंकर (पत्नी), ची.महानिया शैलेश शंकर (मुलगा) व ची.लक्षिता शैलेश शंकर (मुलगी) हे वारस आहेत. तरी सदर मालमत्तेवर कोणाचा गहाण, दान, बक्षिस, लीज, कोर्ट जप्ती किंवा अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क, दावा किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चार दिवसाचे आत खालील पत्यावर भेटून अथवा पोस्टाने पत्र पाठवून योग्य त्या कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी, असे न झाल्यास सदरील मालमत्ता ही निर्वेध आहे असे समजून अथवा कोणाचा हक्क, हितसंबंध असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून सदरील माालमत्ता ही वारसदाराचे नावे करण्यासाठी पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर कोणतीही तक्रार किंवा हरकत घेतल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही.

**परिशिष्ट : रुम क्र.८०६, बी विंग, भूमी हार्मोनी, प्लॉट नं.८२, गोकुळ डेअरी जवळ, कामोठे, पनवेल, जिल्हा रायगड, नवी मुंबई–४१०२०९**

दिनांक : १३/०२/२०२२

स्थळ : कामोठे, नवी मुंबई

**सही/–**
**सौ.ममता शैलेश शंकर**
**रुम क्र.८०६, बी विंग, भूमी हार्मोनी, प्लॉट क्र.८२, गोकुळ डेअरी जवळ, कामोठे, पनवेल,**
**जिल्हा : रायगड, नवी मुंबई–४०२०९**
**मोबाईल क्र.९१६७७६१०१२**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कांबे, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे ७/१२ चे उताऱ्यावरील कब्जेदार सदरात नमूद असलेल्या जमीन मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कांबे, ता.खालापूर, जि.रायगड येथील मिळकत**

| जमीन मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार रु. |
|---|---|---|---|---|
| १) श्री.बबन मनोहर कुरंगळे<br>२) श्री.भरत मनोहर कुरंगळे<br>३) सौ.रेश्मा रघुनाथ भोईर | ४२ | ० | ०–६८–००<br>पो.ख. ०–०४–३०<br>एकूण क्षेत्र ०–७२–३०<br>त्यापैकी ०–१६–००<br>एवढ्या क्षेत्राबाबत | १२ |

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारांस कोणाही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, लिज, लीएन, सदर मिळकतीतून जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे पत्यावर लेखी नोंदवावी.

वरील विहित मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न प्राप्त झाल्यास नोटीसीत नमूद केलेली मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे व मिळकतीचे मालकांचे मालकी व वहिवाटी हक्कासंबंधात कोणताही वाद नाही असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त होणारी हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

दि.१२/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.सागर का. कोंडीलकर**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**ऑफिस : शॉप नं.२१, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, पनवेल, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ**
**ता.पनवेल, जि.रायगड**

राव साहेब कोर्ट

ॲड.सुजाता पाटील

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

प्रोबेट चौ.अर्ज नं.६५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०३/२०२२

श्रीदेवी उर्फ श्रीदेवी नथुसिंग ठाकूर तर्फे कुलमुखत्यार धारक
श्री.अमर प्रदीप ठाकूर
वय : सज्ञान, धंदा : नील
रा.फ्लॅट नं.३०६, पुष्पक सोसायटी, प्लॉट नं.५७,
सेक्टर ११, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले

वरील अर्जदार यांचे पती कै.श्री.नथुसिंग रामदास ठाकूर हे दि.११/०५/२००९ रोजी मु.खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले. मयत कै.श्री.नथुसिंग रामदास ठाकूर यांचे नावे असलेल्या मिळकतीबाबत त्यांनी अर्जदार यांच्या नावे दि.३०/०५/२०२२ रोजी मृत्यूपत्र करण्यात आलेले असून ते उरण दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले असून नोंदणी नं.१७०१/२००२ आहे. यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्ता परिशिष्ट**

**सदनिका नं.३०६, प्लॉट नं.५७, पुष्पक सोसायटी, सेक्टर ११, खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१०**

**क्षेत्रफळ : ५४७ चौ.फूट कारपेट**

**मालमत्ता मुल्यांकन : रुपये ७,००,०००/– (अक्षरी सात लाख मात्र)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने प्रोबेट मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील प्रोबेट बाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे प्रोबेट देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०३/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड
जा.क्र.२२७/२०२२/न्यायशाखा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ
अलिबाग, जि.रायगड
दि.११/०२/२०२२

## चौकशीची जाहीर नोटीस

न्यास नोंदणी अर्ज क्रमांक : ४०४/२०२१

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : SARINGS OF LIFE CHRISTIAN FELLOWSHIP CENTRE (SLCFC) जि.रायगड ...बाबत

श्री.Vailiparambil Abraham Asak ... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा.सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत :–

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

अ) जंगम मिळकत :– (वर्णन) रोख रक्कम ५०००/– रुपये is in custody with ther treasurer Mr.Biju Thomas

ब) स्थावर मिळकत :– (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग यांचे शिक्क्यानिशी आज दि.११/०२/२०२२ रोजी दिली.

**सही/–**
**(श्रीम.अंजली रमेश पिसाळ)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, रायगड विभाग, रायगड**

# संक्षिप्त...

## चहाचे पैसे मागितले म्हणून केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चहाचे पैसे मागितले म्हणून नोकराला हाता बुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ करून दुकानातील सामानाची तोडफोड केल्याचा प्रकार कामोठे येथे घडला आहे. आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सचिन वरंडे यांचा चहा विक्रीचा व्यवसाय सेक्टर १७, कामोठे येथे आहे. यावेळी दोन ईसम मोटरसायकलवरून चहा घेण्यासाठी दुकानात आले. त्यापैकी सिद्धूने चहाची मागणी केली. त्याला चहा देऊन त्याच्याकडे पैशाची मागणी केली असता त्याने चहाचे कसले पैसे असे बोलून शिवीगाळ करून काऊंटरवर ठेवलेले दोन चहाचे थर्मास जमिनीवर फेकले व दुकानांमध्ये प्रवेश करून सचिन यांना आणि त्यांचा नोकर याला हाताबुक्क्यांनी मारहाण केली व तुझ्या दुकान बंद करतो असे बोलून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच दुकानातील इतर सामान अस्ताव्यस्त फेकून तोडफोड केली व नुकसान केले. त्यानंतर ते दोघेही ईसम पळून गेले.

## १२ लाख २४ हजार रुपयांच्या औषधांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आर्थिक फायद्यासाठी १२ लाख २४ हजार रुपयांच्या औषधांची चोरी केल्याप्रकरणी कामोठे पोलिस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश कुमार चौधरी यांचा वैद्यकीय औषधे विकण्यासाठी कुबेर फर्मान सर्जिकल नावाने सेक्टर २१, कामोठे येथे गाळे आहेत. त्यासाठी त्यांनी पाच मुले कामावर ठेवलेले आहेत. ते त्यांच्या गावी राजस्थान येथे गेले असताना नथुराम सोनाराम चौधरी हा ग्राहकांच्या मागणीप्रमाणे औषधे पोहोच करून त्यांच्याकडून धनादेशाद्वारे रोखीने पैसे घेऊन बँकेत जमा करत होता. सुरेश कुमार यांचा अपघात झाल्याने ते बरेच दिवस दुकानांमध्ये गेले नव्हते.

त्यांनी दुकानातील जमा असलेला माल व बँक अकाउंट मध्ये जमा असलेली रक्कम व येणारी उधारी या सर्वांचा ताळमेळ लावण्याचा प्रयत्न केला असता १२ लाख २४ हजार २५१ रुपये रकमेचे तफावत आढळून आले. त्यामध्ये सहा लाख ६३ हजार रुपये रकमेचे औषधे चोरीस गेल्याचे आणि पाच लाख ६० हजार रुपये रकमेची औषधे नोकर नथुराम चौधरी याने चोरून २८ ग्राहकांना १० ते १५ टक्के सवलतीने माल विक्री केली. याप्रकरणी नथुराम सोनाराम चौधरी राहणार (जालोर राजस्थान) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# स्वच्छ सर्वेक्षण २०२२ साठी नगरपरिषदेची जोरदार तयारी

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

स्वच्छ, सुंदर आणि हरित माथेरान ही व्याख्या खऱ्या अर्थाने माथेरान मध्ये अंमलात आणण्यासाठी सुरुवातीला नागरिकांची स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता असणे आवश्यक आहे. प्रशासन हे आपल्या परीने नागरिकांच्या सर्व बाबतीत उद्भवणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी तत्पर असते. मग त्या स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून असोत की अन्य मूलभूत नागरी सोयीसुविधा असोत नेहमीच प्रशासन जनसेवेसाठी पुढाकार घेत आहे.




सध्या इथे प्रशासक राजवट असून माथेरान नगरीला मुख्याधिकारी तसेच एक उत्तम प्रशासक म्हणून सुरेखा भणगे-शिंदे लाभल्या आहेत. त्यांनी स्वतःच्या मनाशी जिद्द ठेवली आहे इथली अस्वच्छता दूर करण्यासाठी त्यांनी खरोखरच पुढाकार घेतला असून स्वतः विविध प्रभागात भेटी देत आहेत. स्वच्छता बाबतीत नागरिकांना सूचना देऊन संपूर्ण परिसर स्वच्छ असणे सर्वांच्या आरोग्यासाठी हितकारक आहे हे पटवून देत आहेत. स्वच्छता सर्व्हेक्षण २०२२ साठी यावेळी निश्चितच माथेरान शहराला शासनाकडून पुरस्कार प्राप्त होणार ही त्यांना खात्री आहे त्या दृष्टीने त्यांनी स्वतःला या कामात वाहून घेतले आहे. गावातील मोकळ्या जागेत असणाऱ्या त्याचप्रमाणे शाळेतील भिंतीवर सुबक चित्रे रेखाटण्यात येत आहेत एकूणच सर्व भिंती बोलक्या केल्या जात आहेत. रस्ते नेहमीपेक्षाही अधिक चकाचक आणि स्वच्छ केले जात आहेत. कचरामुक्त माथेरान ही संकल्पना साक्षात राबविण्यात त्या सध्यातरी मग्न दिसत आहेत.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी इथली जैवविविधता टिकून राहण्यासाठी इथले खास आकर्षण असणारी गर्द झाडी कायमस्वरूपी अबाधित राहावी यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

स्वच्छतेचा संदेश घरोघरी जात असून स्वच्छतेबाबत लोकांची मानसिकता तयार करण्यासाठी त्या आटोकाट प्रयत्न करीत आहेत. प्रशासक सुरेखा भणगे शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार वर्ग खूपच मेहनत घेताना दिसत आहेत.

# नागोठण्यातील ब्राम्हण समाज स्मशानभूमीची दुरूस्तीची मागणी

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे ग्रामपंचायतीच्या अखत्यारित असलेल्या नागोठण्यातील ब्राम्हण समाजासाच्या स्मशानभूमीच्या शवदहन शेड व बांधीव चौथ-याची सध्या अवस्था झाली आहे. स्मशानभूमीवरील शेड व छप्परही नादुरूस्त झाल्याने त्याची नागोठणे ग्रामपंचायतीने लवकरात लवकर दुरूस्ती करावी जेणेकरून अंत्यविधीस येणाऱ्या नागरिकांचे ऊन व पावासापासून संरक्षण होईल अशी मागणी भाजपा महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. यासंबंधीचे हे निवेदन श्रेया कुंटे यांनी नुकतेच नागोठण्याचे सरपंच डा. मिलिंद धात्रक व ग्रामविकास अधिकारी मोहन दिवकर यांच्याकडे दिले. यावेळी भाजपा महिला मोर्चा रोहा तालुका भाजपा उपाध्यक्षा अपर्णा सुटे, नागोठणे विभाग चिटणीस मुग्धा गडकरी उपस्थित होत्या.

नागोठण्यातील ब्राम्हण समाजाच्या या स्मशानभूमीचा परिसर सध्या झाडाझुडपांनी वेढला आहे. याशिवाय बाजूलाच पडीक शौचालय यासारखे अडथळे आहेत. त्यामुळे अंत्यविधी करण्यासाठी येणाऱ्या मृतांच्या नातेवाईकांना व नागरिकांना येथे मोकळी जागा असूनही तेथील अडथळ्यांमुळे जागेचा वापर करता येत नाही व कुठेतरी लांब उभे रहावे लागते. त्यामुळे ही गैरसोय ग्रामपंचायतीने दूर करण्याची गरज आहे. याशिवाय मृत व्यक्तीवर धार्मिक विधी करण्यासाठी या स्मशानभूमीत पाण्याची व्यवस्था



तसेच रात्रीच्या वेळी अंत्यसंस्कार करण्यासाठी वीजेच्या दिव्यांची व्यवस्था लवकरात लवकर करण्याची मागणीही भाजपा महिला मोर्चाकडून करण्यात आली आहे.

दरम्यान यासंदर्भात नागोठण्याचे सरपंच डॉ. मिलिंद धात्रक यांनी सांगितले की, १५ व्या वित्त आयोगाच्या पंचवार्षिक आराखड्यात ब्राम्हण समाज स्मशानभूमीचे हे काम निवेदन देण्याआधिच मंजूर करण्यात आले असून शासनाकडून निधी उपलब्ध होताच येताच ते तातडीने पूर्ण करण्यात येईल असे स्पष्ट केले.

# नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांसोबत आ.गोगावले यांनी घेतली नगरविकासमंत्री ना.एकनाथ शिंदे यांची भेट

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी माणगाव आणि पोलादपूर तसेच खालापूर नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष तसेच उपनगराध्यक्ष यांच्यासह राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. याप्रसंगी आ.गोगावले यांच्यासोबत रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे अलिबाग विधानसभा मतदार संघाचे आ.महेंद्र दळवी, कर्जतचे आ.महेंद्र थोरवे, पोलादपूर तालुका प्रमुख निलेश अहिरे, रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे तसेच पोलादपूर नगराध्यक्षा सोनल गायकवाड आणि नगरपंचायतीमधील इतर नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगरविकास मंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी माणगांव, पोलादपूर आणि खालापूर नगरपंचायतीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी, जनतेने टाकलेला विश्वास विकास कामांच्या रुपाने सार्थकी लावा. यासाठी लागेल तेवढा विकास कामांसाठीचा निधी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन दिले. याप्रसंगी नगरविकासमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी रायगड जिल्ह्यातील तीनही आमदारांसोबत शिवसेनेच्या ध्येयधोरणासंदर्भात आणि महाआघाडीसरकारच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आणि स्वतंत्र चर्चा केल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



# तळवडे येथील विकासकामांचे भूमिपूजन संपन्न



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील पिंपळोली ग्रामपंचायत मधील तळवडे येथील विकासकामांचे भूमिपूजन आज दि.१२ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले.

माजी आमदार,रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुरेश लाड यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा पार पडला.याप्रसंगी तालुकाध्यक्ष भगवान चंचे, महिला तालुका अध्यक्ष ड. रंजना धुळे, अशोक भोपतराव, एकनाथ धुळे, सागर शेळके, सुनील घोडविंदे, चिंधु तरे, बाबू माळी, चिंधू भवारे,बळीराम देशमुख, चंद्रकांत निरगुडा, सुभाष काळण, आत्माराम धुळे, सुरेश काळण,आत्माराम घोडविंदे, दिलीप शेळके, मधुकर डायरे, पांडुरंग डायरे, प्रवीण क्षीरसागर, पद्माकर क्षीरसागर, वंदना हजारे, अक्षय जाधव, आकाश शेळके, समीर शेळके, चंद्रकांत हजारे, भाई क्षीरसागर, संध्या हजारे आदी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट कंपनीकडून शिपिंग क्षेत्रात नोकरीचे आमिष देवून तरुणाची फसवणूक

## नवीन पनवेल महिला काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष पुजा मोहन यांची धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिपिंग क्षेत्रात नोकरीचे आमिष दाखवून अनेक सिफेरर्स तरूणांची आर्थिक फसवणूक केली जाते. अनेक एजेंट आणि बनावट कंपन्या हे तात्पुरत्या भाडे तत्वावर कार्यालय चालू करतात. सोशल मीडियावर जाहिरातीच्या माध्यमातून तरुणांना नोकरीचे आमिष देतात आणि आर्थिक फसवणूक करतात. तसेच त्यांचे सी. डी. सी आणि पासपोर्टसुद्धा ठेवून घेतात. त्यामुळे तरुणांना इतरत्र नोकरी शोधता येत नाही.

शिपिंग क्षेत्रात नोकरीच्या नावाखाली पैसे उकळण्याचे अनेक गैरप्रकार सुरू आहेत. असाच प्रकार नवीमुंबई मधील बेलापूर सी बी डी मध्ये घडला आहे. भावेश पटेल वय वर्ष २६ ह्या तरुणाची फसवूक झाल्याचे उघडकीस आले आहे. ह्या तरुणाने शिपिंग –इ ठरपझ ह्या पदाच्या कामासाठी त्याचा पासपोर्ट आणि सी डी सी सहा महिन्यापूर्वी अविसा मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. ह्या बनावट कंपनीचा मालक गुलशन कुमार ह्याला दिले होते. गुलशन कुमारने त्या तरुणाला ४ दिवसात नोकरीला लावतो असे आमिष देऊन त्याची फसवणूक करत होता.

तसेच त्याच्याकडे १ लाख ८० हजार रुपयांची मागणी करत होता पण भावेशला यात काहीतरी गौडबंगाल आहे हे लक्षात आले आणि त्याने पैसे देण्यास नकार दिला. त्याचा पासपोर्ट आणि सी डी सी परत द्यावी अशी मागणी केली परंतु गुलशन कुमार त्याला सतत टाळाटाळ करत होता. आज देतो उद्या देतो असे करून भावेश पटेल ची फसवणूक करत होता, अखेरीस कंटाळून भावेश ने नवीन पनवेल मधील महिला काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष पुजा मोहन यांच्याकडे आपली कैफियत मांडली. क्षणाचाही विलंब न करता पुजा मोहन यांनी सी बी डी पोलीस स्टेशन गाठले आणि रीतसर ह्या बनावट कंपनीच्या मालकावर गुन्हा नोंद केला.

पोलिसांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले परंतु कारवाई होत नसल्याचे लक्षात येताच नवीन पनवेल महिला काँग्रेस ब्लॉक अध्यक्ष पुजा मोहन यांनी बेलापूर येथील रहेजा अर्केड मधील अविसा मरीन सर्व्हिसेस प्रा. लि. ह्या बनावट कार्यालयाला धडक दिली. त्याठिकाणी मालक गुलशन कुमार ह्याला सदर बाबीबद्दल विचारले असता तो पुन्हा उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला.

भावेश पटेल चा पासपोर्ट आणि सी डी सी देण्यास टाळाटाळ करू लागला. हुज्जत घालू लागला. याच वेळी पूजा मोहन यांनी आपला दणका दाखवताच त्याच्या जवळच असलेल्या ड्रावर मधून भावेश पटेल चा पासपोर्ट आणि सी डी सी दिले. गुलशन कुमार च्या कार्यालयात तो चालवत असलेल्या कपंनी चे अधिकृत सर्टिफिकेट किंवा कागदपत्रे न्हवती म्हणजे हे बनावट कंपनी वाले कशी तरुणांची फसवणूक आणि पिळवणूक करते हे पाहावयास मिळाले. तरुणांना नोकरीचे आमिष देऊन पैसे उकळण्याचा धंदा सुरु आहे याला आळा घालणे फार गरजेचे आहे.

# करंजा येथील रस्त्याचे व स्मशान भूमीच्या नुतनीकरणाचे मनोहर भोईर यांच्या हस्ते भूमीपूजन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील करंजा नाका ते सुरकीचा पाडा, बापदेव पाडा येथील रस्ता खराब झाल्याने सदर रस्त्यावरून जाताना जनतेला वेगवेगळ्या समस्याला तोंड द्यावे लागत होते.

विविध त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्याचा जनतेला त्रास होऊ नये यासाठी रस्त्याचे काम करण्याचे वचन ग्रामपंचायत सदस्य अमित भगत यांनी शिवसेनेच्या वतीने निवडणुकीमध्ये जनतेला दिले होते. त्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा करून माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या प्रयत्नातून जिल्हा नियोजन फंड (डी पी डी सी )या योजनेतून सदर रस्त्याचे काम मंजूर करून घेतले. त्या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सुरकीचा पाडा येथील स्मशान भूमीच्या



शेडच्या बांधकामाचे भूमीपूजनही करण्यात आले. माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले ग्रामपंचायत सदस्य अमित भगत हे आपल्या परिसराचा, विभागाचा विकास व्हावा यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. विविध विकासकामासाठी त्यांचे सतत पाठपुरावा सुरु आहे. विरोधकांना विरोध न करता, त्यांना प्रतीउत्तर न देता प्रत्यक्ष कामातून ते आपली झलक दाखवितात असे मत ग्रामपंचायत सदस्य व्यंकटेश म्हात्रे यांनी व्यक्त केले.परिसरातील नागरिकांनी रस्त्याचे काम सुरु झाल्याने आनंद व्यक्त करत उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी उरण विधानसभा मतदार संघांचे संपर्कप्रमुख महादेव घरत, उरण नगर परिषदेचे गटनेते गणेश शिंदे, चाणजे ग्रामपंचायतचे सरपंच मंगेश थळी, ग्रामपंचायत सदस्य अमित भगत, व्यंकटेश म्हात्रे, कल्पना पाटील, सुप्रिया कोळी, शाखाप्रमुख रोहिदास म्हात्रे, उपशाखाप्रमुख राजू पाटील, उपशाखाप्रमुख विश्वनाथ पाटील,उपविभाग प्रमुख रवी पाटील, उपशाखाप्रमुख चंदन कोळी, माजी उपविभाग प्रमुख के एल कोळी, जेष्ठ शिवसैनिक माणिक पाटील, जेष्ठ नागरिक मधुकर कोळी, रिक्षा संघटनेचे माजी अध्यक्ष महेश पाटील, हरी कोळी (काळ्या बुवा), शिवसैनिक गणेश म्हात्रे, नंदू चव्हाण, चेतन पाटील, सामाजिक कार्यकर्ते मणिराम पाटील,युवराज पाटील, अमृत म्हात्रे, चंद्रकांत कोळी तसेच शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते, परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# पेण तालुक्यातील हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शहा हुसैनी बाबांचा उरूस पारंपरिक पध्दतीने साजरा

**दै.रायगड नगरी । खोपोली**

शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शहा हुसैनी चिश्ती (र.अ.) यांचा ७०२ वा उरुसाचा कार्यक्रम (उर्दू तारखे नुसार ८ रज्जब १४४३) गुरुवार दि. १० फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अगदी साध्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

गेल्या दोन वर्षांपासून संपूर्ण देशात कोरोना शसारख्या महाभयंकर आजार अक्षरशः थैमान घातला असून सर्वसामान्य नागरिकांच्या जनजीवनावर मोठा परिणाम झाला आहे. कोरोनामुळे दोन वर्षापासून येथील दर्गाचा उरूस पारंपरिक व साध्या पद्धतीने साजरा केला जात आहे. सायंकाळी मगरीबची नमाज झाल्यानंतर रायगड व मुंबई परिसरातून आलेल्या मुरीद तसेच गावाकऱ्यांनी उर्स कमेटीतर्फे लंगरचे आयोजन करण्यात आले होते.

रात्री इशा नमाज नंतर ग्यारवी व कुराण पढन, नात शरीफचा कार्यक्रम आणि त्यानंतर हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शहा हुसैनी (र.अ.) यांच्या मजार भक्तिभावाने गुलाबांची फुले, फुलांची चादर, गिलाफ, चढविण्यात आला. सर्वधर्मीय लोक यावेळी सहभागी झाले होते. फुलांच्या चादरी अर्पण केल्या गेल्या. देशावरून कोरोनासारख्या महाभयानक आजाराच्या संकटापासून मानवाचे रक्षण कर, अशी सार्वत्रिक दुवा करण्यात आली. यानंतर संदल आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले.

दख्खनमध्ये आलेल्या १४०० पालख्यासोबत आले होते हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शहा हुसैनी :- चिश्ती सिलसिल्यांचे २० ख्वॉजा हजरत निजामुद्दीन औलिया (महेबुबी इलाही) यांनी दख्खनमध्ये इस्लामच्या प्रचारासाठी त्यांचे हजरत शेख ख्वॉजा मुन्तजोब्द्दीन जरी जर जर बक्ष व हजरत शेख ख्वॉजा बुऱ्हानोद्दीन गरीब औलिया (२१ वे ख्वॉजा) यांना १४०० पालख्या घेवून पाठविले. औरंगाबाद जिल्ह्यातील दौलताबाद व खुलताबाद येथून हजरत शेख ख्वॉजा मुन्तजोब्द्दीन जरी जर जर बक्ष व हजरत शेख ख्वॉजा बुऱ्हानोद्दीन गरीब औलिया (२१ वे ख्वॉजा) यांनी सोबत आलेल्या औलियांना मानव कल्याण व इस्लामच्या प्रचारासाठी महाराष्ट्र दक्षिण भारतात रवाना केले होते.

या १४०० पालख्यासोबतच हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शहा हुसैनी चिश्ती (र.अ.) देखिल आले होते. मराठवाडा व कोकणात इस्लामचा प्रचार-प्रसार करीत हजरत पीर सय्यद बद्रुद्दीन शहा हुसैनी चिश्ती (र.अ.) हे पेण तालुक्यातील जंगलात अल्लाहच्या इबादतसाठी स्थिरावले.

आज त्या ठिकाणी भव्य अशी दर्गाह उभारण्यात आली आहे. कोकणासह देश-विदेशातील सर्व धर्मीय लोक या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. या पवित्र व जागृत स्थळावर मन्नत मांगण्यासाठी व पूर्ण झालेल्या मन्नत फेडण्यासाठी भाविकांचा राबता असतो.